आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२५ मे २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ६६ जणांना पद्म पुरस्कार प्रदान, अभिनेता धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण, तर उद्योजक उदय कोटक, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना पद्मभूषण /रघुवीर खेडकर, जुजर वासी, श्रीरंग देवबा लाड, जनार्दन बोथे गुरुजी पद्मश्रीनं सन्मानित
- देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत, मात्र आंतरराष्ट्रीय भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- १५ मे पासून पेट्रोल आणि डिझेलची चौथ्यांदा दरवाढ
- नीट पेपरफुटीप्रकरणी मनीषा हवालदारला सहा दिवसांची सीबीआय कोठडी
- राज्यात दोन वेगवेगवेगळ्या रस्ते अपघातात १४ जणांचा मृत्यू, २५ जखमी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ७४ अंकांची वाढ

<><><><><><>

विविध क्षेत्रात समर्पित कार्य करणाऱ्या मान्यवरांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं. यंदा १३१ मान्यवरांना हे सन्मान जाहीर झाले असून आज पहिल्या टप्प्यात ६६ जणांना राष्ट्रपतींनी पुरस्कार प्रदान केले. प्रख्यात व्हायोलिनवादक डॉ. एन राजम यांना पद्मविभूषणनं सन्मानित केलं. अभिनेता धर्मेंद्र यांच्यासाठीचा पद्मविभूषण सन्मान त्यांच्या पत्नी हेमामालिनी यांनी स्वीकारला. प्रसिद्ध उद्योजक उदय कोटक, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना पद्मभूषण देण्यात आला. जाहीरात क्षेत्रातले अग्रणी पीयुष पांडेय यांना पद्मभूषण मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

कला साहित्य समाजसेवा विज्ञान, संशोधन,क्रीडा इत्यादी क्षेत्रातल्या योगदानाबद्दल ५८ जणांना पद्मश्रीने सन्मानित करण्यात आलं. महिला क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर, रंगकर्मी रघुवीर खेडकर, आयआयटी मुंबईचे माजी संचालक जुजर वासी यांचा त्यात समावेश होता. राज्यातले प्रगतीशील शेतकरी श्रीरंग देवबा लाड तसंच अमरावती जिल्ह्यातल्या गुरुकुंज मोझरीचे जनार्दन बोथे गुरुजी यांनाही पद्मश्रीनं सन्मानित केलं. याबाबत प्रतिक्रिया देताना बोथे गुरुजी म्हणाले....

.... **होल्ड-बाईट- बोथे**

मूळच्या महाराष्ट्रातल्या आणि छत्तीसगढच्या आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या सुनीती आणि रामचंद्र गोडबोले या डॉक्टर दांपत्याचा आजच्या सत्कारमूर्तींमधे समावेश होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सह मंत्रिमंडळाचे अनेक सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><><>**

देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत आहे, मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत आहेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सिडबी म्हणजे स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया च्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विशेषतः पश्चिम आशियातला संघर्ष पेटल्यानंतर खतं, सोनं, इंधन या सर्व उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय बाजारातले दर कडाडले असून त्यामुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यावर ताण येतो.

अशा परिस्थितीत प्रधानमंत्र्यांनी सोनं खरेदी करु नये, खतांचा वापर कमी करावा, इंधनाची काटकसर करावी, परदेशप्रवास शक्यतो करु नये अशी आवाहनं जनतेला केली आहेत. त्याबाबत विरोधक अपप्रचार करत असल्याचं त्या म्हणाल्या. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या मजबुतीचं प्रतिबिंब जीएसटी महसुलात पहायला मिळतं असं त्यांनी सांगितलं.

सध्याच्या आव्हानावर मात करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली....

**- - होल्ड- अर्थमंत्री - - -**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या सक्षमीकरणासाठी, तळागाळापर्यंत पतपुरवठा वाढवण्यासाठी आणि ग्रामीण उद्योगांच्या आधुनिकीकरणाला गती देण्यासाठी स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (सिडबी) द्वारे तयार केलेल्या धोरणात्मक पोर्टल्स आणि उपक्रमांचं उद्घाटन अर्थमंत्र्यांनी केलं. ग्रामीण अर्थव्यवस्था सिडबीच्या माध्यमातून अधिक बळकट होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी विविध लाभार्थींना उद्योग व्यवसायांच्या वाढीसाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते अर्थ सहाय्य वितरित करण्यात आलं.

**<><><><><>**

पेट्रोलच्या दरात आज २ रुपये ६१ पैसे, तर डिझेलच्या दरात २ रुपये ७१ पैशांची वाढ झाली. गेल्या दोन आठवड्यातली पेट्रोल-डिझेलची ही चौथी दरवाढ आहे. या वाढीनंतर मुंबईत पेट्रोलचे दर १११ रुपये २१ पैसे प्रति लिटर तर डिझेलचे दर ९७ रुपये ८३ पैसे प्रति लिटर झाले आहेत. दिल्लीत पेट्रोल १०२ रुपये १२ पैसे आणि डिझेल ९९ रुपये ५१ पैसे प्रति लिटर दराने मिळेल.

१५ मे पासून आजपर्यंत चार वेळा पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ झाली असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ७ रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. एप्रिल २०२२ नंतरची ही सर्वात मोठी वाढ आहे.

**<><><><><>**

१५ मे पासून चौथ्यांदा इंधन दरवाढ झाल्याबद्दल लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर टीका केली आहे. आर्थिक संकट येण्याची शक्यता असल्याचा इशारा आपण पूर्वीच देत होतो, मात्र सरकारने लक्ष दिलं नाही असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><><>

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारच्या धोरणांमुळे इंधन दरवाढ होत असल्याची टीका केली आहे. गेल्या १०दिवसांत पेट्रोल-डिझेल दरात साडे सात रुपयांची वाढ झाल्याचा दावा त्यांनी नागपुरात केला.

कापूस, कांदा आणि धान उत्पादक शेतकरी संकटात असून हमीभाव मिळत नसल्याचंही त्यांनी सांगितलं. विधान परिषद निवडणुकीत पैशांचा वापर होत असल्याचा आरोप करत पक्षादेश मोडणाऱ्यांवर कारवाईचा इशारा त्यांनी यावेळी दिला.

<><><><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणी अटकेत असलेल्या प्राध्यापक मनिषा हवालदार यांना दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाने सहा दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांच्यासमोर या प्रकरणाची आज सुनावणी झाली. मनिषा हवालदार यांना २२ मे ला अटक करण्यात आली होती, हवालदार यांनी नीटच्या भौतिकशास्त्राच्या पेपरचे प्रश्न विद्यार्थ्यांना पुरवल्याचा सीबीआयला संशय आहे.

<><><><><><>

राज्यात आज दोन वेगवेगळ्या अपघातात चौदाजणांचा मृत्यू झाला.

महाबळेश्वर आणि पोलादपूरला जोडणाऱ्या आंबेनळी घाटात  पहाटे एक गाडी दरीत कोसळून झालेल्या अपघातात ८ जण ठार झाले. हर्णे बंदर इथं फिरायला गेलेले आठजण या गाडीने परतत असताना चालकाचा ताबा सुटून हा अपघात झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या अपघाताबद्द्ल दुःख व्यक्त केलं आहे.

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर धुळे तालुक्यातल्या लळिंग घाटात रेतीचा डंपर समोरुन येणाऱ्या ट्रकला धडकून अपघात झाला. या अपघातात पाच जण ठार झाले तर पंचवीस जखमी झाले. टोलनाक्यावरचे कर्मचारी अपघातग्रस्त वाहनातून

जखमींना बाहेर काढण्याचे काम करत असतानाच वेगात येत असलेली एक खासगी बस अपघातग्रस्त ट्रकला मागून धडकली आणि एक टोल कर्मचारी जखमी झाला. हा कर्मचारीही मरण पावला असून त्यामुळे या अपघातातल्या मृतांची एकूण संख्या सहा झाली आहे. यानंतर टोल कर्मचाऱ्यांनी आंदोलन करत मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदतीसह टोल कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी विमा संरक्षण आणि अपघातस्थळी सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

<><><><><><>

अमेरिका-इराण संघर्ष समाप्त होण्याबाबत करार होण्याच्या आशेने आज शेअर बाजारात तेजी दिसून आली. आजच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ७४ अंकांची वाढ झाली, आणि तो ७६ हजार ४८९ अंकांवर बंद झाला, तर निफ्टी ३१२ अंकांनी वाढून २४ हजार ३२ वर स्थिरावला.

कच्च्या तेलाच्या किमती घसरल्यानं महागाईची चिंता कमी झाली असल्यानं बाजारात खरेदीदारांमध्ये उत्साहाचं वातावरण होतं.

<><><><><><>

राज्यात काही भागात आज पावसाने जोरदार हजेरी लावली.

**छत्रपती संभाजीनगर** शहरासह जिल्ह्यात आज विविध ठिकाणी दुपारी पाऊस पडला. अचानक झालेल्या पावसामुळे उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी पिकांच्या नुकसानीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. **धाराशिव** शहर आणि परिसरात आज हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला. **बीड** जिल्ह्यात माजलगाव इथल्या लऊळ परिसरात आज वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या घरावरील पत्रे उडाले तसंच गारपीट आणि मुसळधार पावसामुळे शेतातली पिकं आडवी झाल्यानं शेतीचं मोठं नुकसान झाल्याचं वृत्त आहे. **लातूर** जिल्ह्यात निलंगा तालुक्यासह इतर ठिकाणी आज

पावसाने जोरदार हजेरी लावली. काही ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या तुटल्या तर काही काळ वीजपुरवठाही खंडित झाला होता.

**रत्नागिरी** जिल्ह्यात काल दिवसभरात २६ मिलिमीटर पाऊस झाला. महामार्गाची कामं अर्धवट असल्याने अनेक ठिकाणी वाहतुकीवर परिणाम झाला होता. तसंच वेगवान वाऱ्यामुळे वीजवाहिनीच्या तारा तुटल्यामुळे दापोलीत तब्बल १८ तास वीजपुरवठा खंडित झाला होता.

<><><><><><>

गेल्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात काही ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रह्मपुरी इथं ४७ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता आहे.

//<><><><><><>//